# मुंबई विद्यापीठ

**परिपत्रक**

क्र. मासविक/आयसीडी/२०२१–२२/३१

संदर्भ– १) महाराष्ट्र शासन संचालनालय यांचेपत्र क्र. कोरोना/२६२१/प्र. क्र. ३०/मवि–१/५७७३, दिनांक ५/४/२०२१

२) Government of Maharashtra, Dept. of Revenue and forest, Disaster Management Order No, DMU/2020/CR.92/Dism-1, Dated 4th April, 2021

मुंबई विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/विद्यापीठातील सर्व विभागाचे संचालक / विभागप्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, प्रभारी ग्रंथपाल, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी, समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र, समन्वयक, ठाणे उपपरिसर, समन्वयक, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग न्यू अप्लाईड सायन्ससेस, कल्याण उपकेंद्र, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागाचे/कक्षाचे प्रमुख यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र राज्यामध्ये कोवीड १९ या संसर्गजन्य विषाणूचा प्रादुर्भाव थांबविण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा–२००५ व साथरोग कायदा–१८९७ कलम (२) अन्वये विहीत केल्यानुसार ५ किंवा ५ पेक्षा जास्त व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी एकत्रित येऊ नये म्हणून संपूर्ण राज्यामध्ये कलम १४४ अन्वये संचारबंदी लागू केल्यामुळे विद्यापीठ परिसर व उपपरिसरातील तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयात दिनांक ३०.०४.२०२१ पर्यत ऑनलाईन द्वारे अनुज्ञेय असणारे सर्व कार्य/शैक्षणिक कामकाज नेहमीप्रमाणे सुरू राहील व work from home नुसार सर्व संबंधित अध्यापकांची ऑनलाईन द्वारे उपस्थिती ग्राहय धरण्यात यावी. तथापी NAAC/परीक्षा अथवा इतर अत्यावश्यक कार्यासाठी विद्यापीठातील विभागप्रमुख/प्राचार्य यांनी गरजेप्रमाणे बोलाविल्यावर संबंधित प्राध्यापकांनी हजर राहणे आवश्यक असेल.

महाविद्यालयातील/विद्यापीठ शैक्षणिक विभाग/प्रशासकीय कार्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांना प्राचार्य/विभागप्रमुखांनी निर्देशित केल्यानुसार एकूण कर्मचाऱ्यांपैकी 50% कर्मचाऱ्यांची उपस्थिती अलटून पालटून पध्दतीने अनिवार्य असून आवश्यक सेवा पुरविणारे कर्मचारी तसेच विभाग प्रमुखांना आवश्यकता असेल अशा वेळेस

सर्व संबंधित कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहणे गरजेचे असेल. कार्यालयाच्या ठिकाणी नियमितपणे मास्क वापरणे, हात वारंवार धुणे/सॅनिटाइज करणे व केंद्र शासनाने निर्देशित केल्यानुसार कोवीड–१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कार्यालयातील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी लसीकरण करून घेणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच अभ्यागतांनी कार्यालयामध्ये प्रत्यक्ष न भेटता दूरध्वनी किंवा व्हिडिओ कॉलद्वारे कार्यालयीन अधिकारी /कर्मचाऱ्यांसोबत संपर्क साधवा. अभ्यागतांना प्रत्यक्ष भेटणे अनुज्ञेय राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

प्रस्तुत प्रकरणी विद्यापीठांनी यापूर्वी निधारीत वेळापत्रकानुसार घोषित केलेल्या प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांच्या परीक्षा नियमितपणे ऑनलाईनद्वारे सुरू राहतील. तरी परीक्षा आयोजित करणाऱ्या केंद्रप्रमुखांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व साथरोग १८९७ अन्वये विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेणे अनिवार्य असून विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने ऑनलाइनद्वारे परीक्षा पध्दतीचा अवलंब करावा, याबाबत महाविद्यालयीन प्रशासनाने विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे तसेच उक्त प्रकरणी परीक्षेच्या ठिकाणी काम करणाऱ्या अध्यापक/कर्मचा–यांनी लसीकरण करून घ्यावे.

कोवीड–१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र शासन किंवा स्थानिक जिल्हा प्रशासन यांनी आगामी काळात वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश सर्व संबंधितांवर बंधनकारक राहतील, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

मुंबई– ४०० ०३२
दिनांक: ०६/०४/२०२१

प्रति,
सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य
विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभागप्रमुख
प्रभारी, प्राचार्य, सर.ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यायाचे
प्रभारी, ग्रंथपाल, ज्ञानस्त्रोतकेंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
प्रभारी, वित्त व लेखा अधिकारी, समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र,
समन्वयक, ठाणे उपपरिसर, समन्वयक, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग न्यू अप्लाईड सायन्ससेस,

कल्याण उपकेंद्र, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखनसामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव
प्रभारी कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागाचे/ कक्षाचे प्रमुख/ प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये

(१) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१ विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव

२ उपकुलसचिव/ मुख्य लेखापाल/ (वित्त व लेखा विभाग)

३ स्था. नियंत्रक, मुद्रणलेखा सामुग्री, विद्यापीठ मुद्रणालय

४ विद्यापीठ अभियंते (फोर्ट परिसर व विद्यानगरी परिसर)

५ सर्व सहायक कुलसचिव/सहायक कुलसचिव (वित्त व लेखा विभाग)

६ सुरक्षा अधिकारी/ तसेच सर्व सहायक सुरक्षा अधिकारी

७ कुलसचिावांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे / कक्षाचे प्रमुख

८ उद्यान अधीक्षक/अधीक्षक (तांत्रिक), विधी विभाग

९ स्वीय सहायक (१) कुलगुरू (२)प्र—कुलगुरू (३) प्रभारी कुलसचिव
(४) प्रभारी वित्त व लेखा अधिकारी
(५) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ

(ब) प्रतमाहितीसाठीअग्रेषित

१ अध्यक्ष, मुंबई युनिवर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर असोसिएशन (मुनोवा)

२ सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ

३ सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव